**प्रेस नोट** **दि.१५/०३/२०१९**

## खडक पोलीस स्टेशन

## पुणे महानगरपालिकेच्या महागडया लोखंडी जाळया चोरणारा चोरटया जेरबंद

सदर बाबत अधिक माहिती अशी की, खडक तपास पथकातील अधिकारी/कर्मचारी हे खडक पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं १२२/२०१९ भा.दं.वि कलम ३७९ या गुन्हयातील चोरीस गेलेल्या ९६,०००/- रु किं च्या लोखंडी जाळया चोरणाऱ्या चोरटयाचा शोध घेत असतांना, पोलीस कर्मचारी रवी लोखंडे व विनोद जाधव यांना त्यांचे बातमीदाराने बातमी दिली, साधारण पंधरा ते वीस दिवसांपुर्वी वेगा सेंन्टरकडून स्वारगेटकडे जाणाऱ्या भुयारी मार्गातील लोखंडी जाळ्या चोरणारा इसम हा विजयसिंह घोरपडे उद्यान येथे येणार आहे व त्याचे वर्णन सांगितले,अशी खात्रीशीर माहिती प्राप्त झाल्याने सदरची बातमी मा.राजेन्द्र मोकाशी साो वरिष्ठ पोलीस निरीक्षक खडक पोलीस स्टेशन पुणे यांना सांगुन त्याचे मार्गदर्शनाखालील सदर ठिकाणी स्टाफचे मार्फतीने सापळा रचला असता, थोडयाच वेळात बातमीतील नमुद वर्णनाचा इसम हा त्याठिकाणी येवुन कोणाची तरी वाट पाहता थांबला असल्याचे सर्व स्टाफचे लक्षात आल्याने, त्यास स्टाफचे मार्फतीने अचानक झडप घालुन त्यास ताब्यात घेण्यात आले, तेव्हा त्यास त्याचे नाव पत्ता विचारला त्याने आपले नाव **विनोद बापु पाटोळे वय २२ वर्ष रा.जनता वसाहत, गल्ली नं.३, कांदेआळी, पर्वती, पुणे ९** असे सांगितले. त्याचेकडे वरील चोरीस गेलेल्या जाळयाचे बाबत विचारणा केली असता त्याने गुन्हयाची कबुली देवुन त्या दाखल गुन्हयात दिनांक ११/३/२०१९ रोजी अटक करण्यात आली. गुन्हयाचा तपास करीता असतांना त्याने चोरलेल्या चाळया १६४, घोरपडे पेठ मे बी चंद्रकांत आणि कंपनी या दुकानाचे शेजारील असलेल्या सार्वजनिक, शौचालया लगतच्या साचलेल्या कचऱ्यात टाकुन दिल्याचे सांगितल्याने सदरच्या महागडया २८ बाय २८ इंच लांबीची लोखंडी काळ्या रंगाच्या एकुण ९ जाळ्या गुन्हयाचे पुरावेकामी जप्त करण्यात आल्या आहेत.

वर नमुद सर्व कारवाई ही श्री रविंद्र सेनगावकर, अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे , श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ व श्री. प्रदिप आफळे ,सहा पोलीस आयुक्त फरासखाना विभाग यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन चे श्री.राजेन्द्र मोकाशी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.उत्तम चक्रे पोलीस निरीक्षक (गुन्हे) तपास पथकाचे प्रभारी सहा पोलीस निरीक्षक श्री.उमाजी राठोड, पोलीस कर्मचारी विठ्ठल पाटील, विनोद जाधव, संदिप पाटील, रवी लोंखडे, आशिष चव्हाण, प्रमोद नेवसे, समीर माळवदकर, बंटी कांबळे, राकेश क्षिरसागर, महावीर दावणे, योगेश जाधव, विशाल जाधव, इम्रान नदाफ, सागर केकाण, हिम्मत होळकर, यांचे पथकाने केली.

(राजेन्द्र मोकाशी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
खडक पोलीस स्टेशन पुणे